# हवामान आधारीत कृषि सल्ला

## जिल्हा कृषि हवामान केंद्र, ग्रामीण कृषि मौसम सेवा,
## डॉ. हेडगेवार सेवा समिती, कृषि विज्ञान केंद्र,नंदुरबार

दूरध्वनी : ०२५६४ २६०५४४ ईमेल: kvk_ndb@yahoo.com

**१८) जिल्हा: नंदुरबार हवामान आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. ३० मे, २०२५**

| हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (३१/०५/२०२५ ते ०४/०६/२०२५) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | ३१ | ०१ | ०२ | ०३ | ०४ |
| पाऊस (मिमी) | ३ | २ | ४ | ३ | २ |
| कमाल तापमान (अं.से.) | ३६ | ३६ | ३६ | ३५ | ३५ |
| किमान तापमान (अं.से.) | २६ | २६ | २६ | २६ | २५ |
| ढग स्थिती (आकाश) | अंशत: ढगाळ | अंशत: ढगाळ | अंशत: ढगाळ | अंशत: ढगाळ | अंशत: ढगाळ |
| स. सापेक्ष आर्द्रता (%) | ७८ | ७९ | ७७ | ८० | ८० |
| दु. सापेक्ष आर्द्रता (%) | ६३ | ६४ | ६३ | ६८ | ६९ |
| हवेचा वेग (किमी/तास) | २७ | २७ | २१ | २० | १८ |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| | | |
|---|---|---|
| पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज सारांश | | भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त हवामान अंदाजानुसार जिल्ह्यात पुढील पाच दिवस तुरळक ठिकाणी अतिशय हलका ते हलक्या स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. कमाल तापमान ३५ ते ३६ अंश सेल्सिअस तर किमान तापमान २५ ते २६ अंश सेल्सिअस पर्यंत राहण्याची शक्यता आहे. |
| पुढील आठवड्याचा विस्तारित श्रेणी हवामान अंदाज | | दि. ४ ते १० जून २०२५ दरम्यान मध्य महाराष्ट्रात कमाल व किमान तापमान सरासरीपेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे. |
| **पीक** | **अवस्था** | **कृषी विषयक सल्ला** |
| सामान्य सल्ला | | खरीप हंगामाच्या पूर्वतयारीच्या दृष्टीने जमिनीची योग्य मशागत आणि मातीचे परीक्षण करून घ्यावे. जमिनीची पूर्वमशागत झालेली असल्यास पावसाचे पाणी जमिनीत मुरविण्यासाठी मध्यम जमिनीत वाफे आणि भारी जमिनीत सरी वरंबे करावेत. शेतातील मातीचा नमुना घेऊन माती परीक्षण करून त्यात अन्नद्रव्याचे प्रमाण, जमिनीचा आम्ल विम्ल निर्देशांक याची माहिती घ्यावी. खरीप हंगामातील पिकांच्या पेरणीसाठी दर्जेदार व प्रमाणित बियाण्याचे नियोजन करावे. |
| संदेश | | माती परीक्षण करून अहवालानुसार अन्नद्रव्यांचे वर्गीकरण करून त्यानुसार खतांची मात्रा देण्याचे नियोजन करावे. |
| बागायती कापूस | पेरणी | कापूस लागवडीपूर्वी हेक्टरी १० ते १२ टन चांगले कुजलेले शेणखत किंवा कंपोस्ट खत शेतात पसरावे. बीटी कपाशीसाठी पेरणीच्यावेळी हेक्टरी २५ किलो नत्र, ६५ किलो स्फुरद, व ६५ किलो पालाश द्यावे, बिगर बीटी कपाशीसाठी पेरणीच्या वेळी हेक्टरी २० किलो नत्र, ५० किलो स्फुरद व ५० किलो पालाश द्यावे. बीटी कपाशीची लागवड ९० × ९० सें. मी किंवा १२० × ६० सें. मी. स-या पाडून करावी. पेरणीपूर्वी प्रति किलो बियाण्यास २५ ग्रॅम अझोटोबॅक्टर किंवा अझोस्पिरीलम आणि २५ ग्रॅम स्फुरद विरघळणारे जिवाणू तसेच ५ ग्रॅम ट्रायकोडर्माची बिजप्रक्रिया करून स-या ओलावून पेरणी करावी. |
| सोयाबीन | उगवणक्षमता तपासणी | सोयाबीन बियाण्याची उगवणक्षमता तपासणी करण्याकरिता गोणपाट अथवा वर्तमानपत्राचा कागद वापरावा. एका ओळी मध्ये दीड ते दोन सेंटिमीटर अंतरावर १० दाणे ठेवावे, अशाप्रकारे दहा ओळींमध्ये एकूण १०० दाणे व्यवस्थित रांगेत ठेवावे. त्यानंतर गोणपाटावर अथवा वर्तमानपत्रावर पाणी टाकून ओले करावे व ते गोल गुंडाळून थंड ठिकाणी सावलीत ठेवावे. अधूनमधून त्यावर पाणी शिंपडत रहावे. सहा ते सात दिवसानंतर कोंब आलेले दाणे वेगळे करून मोजावे. जर उगवण झालेले बियाण्यांची सरासरी संख्या ७० पेक्षा कमी असेल तर एकरी बियाण्यांचे प्रमाण थोडे वाढवावे. |
| तुर | जमिनीची | जमिनीची निवड: मध्यम ते भारी, पाण्याचा उत्तम निचरा होणारी जमीन तूर |

**दूरध्वनी : ०२५६४ २६०५४४** **ईमेल: kvk_ndb@yahoo.com**

| | | |
|---|---|---|
| | निवड | पिकाकरिता योग्य असून चोपण, पाणथळ जमिनीत्त तूर चांगली येत नाही. कसदार, मुसमुशीत, पोयट्याच्या जमिनीत सुध्दा तूर चांगली येते. जमिनीत स्फुरद, कॅल्शियम, गंधक या द्रव्यांची कमतरता नसावी. साधारणत: ६.५ ते ७.५ सामु असलेली जमीन या पिकास योग्य असते. |
| **भुईमुग** | **पक्वता** | पिकांची पाने पिवळी पडू लागतात. शेंगाचे टरफल टणक बनते व शेंगाच्या टरफलाची आतील बाजू काळी दिसू लागते. त्यानुसार काढणी करावी. |
| **बाजरी** | **पक्वता** | पक्वता अवस्थेत असलेल्या पिकांची काढणी करून सुरक्षित ठिकाणी ठेवण्याची व्यवस्था करावी. |
| **पपई** | **वाढीची** | नवीन लागवड केलेल्या पपई रोपांवर मुळकुजव्या किंवा इतर बुरशीजन्य रोगामुळे मर आढळून आल्यास कॉपर ऑक्सिपक्लोवराईड २ ग्रॅम प्रति लिटर किंवा बाविस्टीन १ ग्रॅम प्रति लिटर याप्रमाणे आळवणी करून घ्यावी. |
| **ऊस** | **वाढीची** | सुरु ऊस लागवडीनंतर जमिनीच्या मगदुराप्रमाणे ८ ते १० दिवसाचे अंतराने पाण्याच्या पाळ्या द्याव्यात. |
| **पशुसंवर्धन** | - | पावसाळ्यापुर्वी गोठा दुरुस्त करावा. छताची छिद्रे बंद करावीत. गोठ्याभोवती पाणी साचणार नाही, गोठ्यात ओलसरपणा राहणार नाही याची दक्षता घ्यावी. गोठे स्वच्छ व कोरडे ठेवावेत. जनावरांचे खाद्य दमट आर्द्रतायुक्त वातावरणात साठवू नयेत. त्यामध्ये ओलसरपणा मुरणार नाही याची काळजी घ्यावी. |

**स्त्रोत**

१) **हवामान पूर्वानुमान : भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई.**

**ठिकाण : कृषि विज्ञान केंद्र, नंदुरबार**
**दि. : ३०/०५/२०२५**

**स्वाक्षरीत**
**प्रमुखअन्वेषक, ग्रामीण कृषि मौसम सेवा-जिल्हा कृषि हवामान केंद्र, कृषि विज्ञान केंद्र, नंदुरबार**